Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- I JANUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# बखर वाड्मय : प्रेरणा व स्वरूप

प्रा. डॉ. मानसी दशरथ जगदाळे
आदर्श कॉलेज, विटा.

बखर वाड्मय उत्पत्ती :–

बखर म्हणजे खबर किंवा वार्ता, समाचार, व्रत होय. 'खबर' या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन 'बखर' या शब्दाची निर्मिती झाली आहे. बक म्हणजे बोलणे या धातूपासून बखर या शब्दाची निर्मिती झाली असावी असे वि. का. राजवाडे यांचे मत आहे बखर या शब्दाचा मूळ रुढार्थ राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक व्रतकथन करण्याच्या गरजेतून मराठी बखर वाड्मयाची निर्मिती झाली आहे. मराठ्यांच्या इतिहासावर आणि घटना–प्रसंगावर सुमारे दोनशे–अडीशे बखरी लिहल्या आहेत.रचनाकाळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर म्हणून महिकावतीची बखर समजली जाते. बखर वाड्मयाचा उगम इतिहासविषयक मौखिक कथाकथनातून झालेला आहे. शूरवीरांच्या लोककथा, रामायण, महाभारतातील कथा यांच्या मौखिक परंपरेत बखर वाड्मयाचा उगम आढळतो.'महिकावतीची बखर' हा वाड्मयातील विकासाचा पहिला आणि महत्वाचा टप्पा आहे. 'महिकावतीची बखर' आणि 'राक्षतागडची बखर' या बखरींनी बखर वाड्मयाच्या प्रवाहांची दिशा निश्‍चित केली आहे. तर 'सभासद बखरीने' पेशवेकालीन शिवचरित्रपर बखरींच्या विकासाची दिशा ठरवून दिली आहे

बखरीचे एकूण पाच प्रकार पडतात. त्यामध्ये

१) समकालीन बखरकाराने समक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या राजकीय घटना प्रसंगावर आधारित बखरी.
२) आठवणी, दंतकथा, आख्यायिका किंवा पारंपरिक हकिगती यांच्या आधारे लिहिलेल्या उत्तरकालीन बखरी.
३) ऐतिहासिक कागदपत्रे, जुने ग्रंथ, दप्तरातील टिपणे यांच्या आधारे लिहिलेल्या उत्तरकालीन बखरी.
४) बखरसदृश ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन.
५) ऐतिहासिक किंवा राजकीय विषय नसलेल्या परंतू बखर हे नाव असलेल्या बखरी.

वरील सर्व बखरींचे लेखन गद्यातून झालेले आढळते. फक्त महिकावतीची बखर गद्यपद्य मिश्र ति आहे. मालाडच्या देसला नायकोराव यांच्या आज्ञेनुसार या बखरींचे लेखन झाले आहे. बखरकार हे सरकार दरबारचे आश्र ति किंवा कारकून पेशातील असल्यामुळे बखरलेखनाची जबाबदारी त्यांच्यावर पडली.

बखर : स्वरूप आणि प्रेरणा :–

बखरींचे बहिरंग आणि अंतरंग असे दोन प्रकार पडतात. बखरींच्या बहिरंग लेखनामध्ये पत्रलेखन संकेत, राजाज्ञा, वंशानुचरीत यांचा समावेश केलेला असतो. मराठी बखरींचे अंतरंग पूर्णपणे अस्सल मऱ्हाटमोळे आहे. बखर इतिहासातील घटनांची संगती लावते, त्याला कथात्मक रूप देते. घटना आणि व्यक्ती यांची कार्यकारण परंपरा साधते. व्यक्तींच्या भावभावनांचे व अंतरंगाचे दर्शन घडविते. तसेच बखरींच्या अंतरंगामध्ये व्यक्तिदर्शन, मानवी जीवनदर्शन, अभिव्यक्तीमधील विविधता, भाषाशैली यांचा समावेश केलेला असतो.

शिवपूर्वकालीन आणि शिवकालीन बखरीत प्रेरणा सुप्त आहेत. पेशवेकाळात बखरवाड्मयाला बहार आलेला होता. बखर निर्मितीमागे वाड्मयीन प्रेरणा आहे. बखरकरांना जसे इतिहास वास्तवाचे भान आहे, तसे वाड्मयीन सौंदर्याची जाणीव आहे. वाड्मयाच्या दृष्टीने बखरीतील कथानिवेदनास अत्यंत महत्व आहे.या वाड्मयप्रवाहांच्या निर्मितीमागे भक्ती होती, अध्यात्म होते, पारलौकिक जीवनाची ओढ होती. लौकिक जीवनाची धारणा होती. दैववाद प्रारंब्ध, श्रद्धा, जीवननिष्ठा होती. समाजजीवनाचे प्रतिबिंब या वैशिष्ट्यामुळे बखर वाड्मयास मराठी साहित्यात एक स्वतंत्र स्थान प्राप्त झाले आहे.

बखर म्हणजे वृत्तकथन :–

तत्कालीन राजकीय जीवनातील घटनांचे कथन आपणास बखरीमध्ये पहावयास मिळते. बखरकार हे आश्र ति असल्यामुळे आपल्या मालकाचा गौरव बखरीत येणे

स्वाभाविक होते. त्यामुळे आवेश, आवेग आणि अतिशयोक्ती बखरीत येते. बखरीमध्ये वृत्तकथनासोबत रंजकत्व हाही लेखनाचा हेतू दिसतो. त्यासाठी बखरकार आलंकारिकता, कल्पकता याचा आश्रय घेतो.बखरकार हा प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि ऐकलेल्या प्रसंगाचा किंवा व्यक्तीच्या वर्णनाशी एकरूप होतो. त्यात आपल्या कल्पकतेचे रंग भरून तो प्रसंग साक्षात आपल्यापुढे जिवंत उभा करतो. उदा. भाऊसाहेबांच्या बखरीत असे जिवंत आणि नाट्यपूर्ण प्रसंग सतत येत असतात. या बखरी म्हणजे प्राचीन मराठी वाङ्मयाचा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे. बखरीमध्ये व्यक्तिचित्रण, प्रसंगचित्रण यांचे दर्शन घडते. कल्पकता, सूक्ष्मनिरीक्षण आणि निवेदन कौशल्यामुळे ते उठावदार प्रकटते. बखरीमध्ये प्रसंगानुरूप बदलणारी भाषा, अलंकारिकता, कल्पनारम्यता, सुभाषिते, म्हणी आणि वाक्यप्रचार यांचा वापर केलेला दिसतो.

शिवपूर्वकालीनबखरी**:**–

शिवपूर्वकालीन बखरींची संख्या अत्यंत अल्प आहे. 'महिकावतीची' उर्फ 'माहीमची बखर' ही सर्वात जुनी बखर आहे. माहीम प्रांताचा इतिहास हा या बखरीचा विषय आहे. कोकणचा इतिहास या बखरीमुळे प्रकाशझोतात आला आहे. तत्कालीन राज्यव्यवस्था, जमीन मोजण्याची पद्धत, सैन्यांच्या व सरदारांच्या याद्या, नावे, गावे, किल्ले या ऐतिहासिक गोष्टींचा उल्लेख आला आहे. व्यक्तिचित्रण, स्थलचित्रण, घटनाप्रसंग यांचे वर्णन नेटके आणि आटोपशीर केले आहे. साधी, सोपी भाषा, आकर्षक निवेदन, व्यक्तिचित्रण हे बखरकारांचे वैशिष्ट्य आहे. राक्षसतागडची बखरीमध्ये विजयनगरच्या विध्वंसाचीमाहिती मूळ कानडी बखरीच्या आधारे दिली आहे. व्यक्ती आणि घटना यांच्या वर्णनाशी लेखक एकरूप झाला आहे. अचूक माहिती, उत्कृष्ट भाषाशैली, व्यक्ती व घटना यांचे यथार्थ वर्णनामुळे या बखरीचे स्थान उच्च आहे. 'शालिवाहनाची बखर' ही वि. का. राजवाड्यांच्या मते, सर्वात जुनी बखर आहे. या बखरीमध्ये कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग या विभागांची माहिती पौराणिक पद्धतीने आली आहे.

शिवकालीन बखरी **:**–

शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने महाराष्ट्राला प्रेरणा मिळाली. या पार्श्वाभूमीचा शिवचरित्रपर बखरीशी निकटचा संबंध आहे. 91 कलमी बखर ही शिवचरीत्रावरील पहिली बखर होय. सभासदाची बखर ही पहिली बखर होय. कृष्णाजी अनंत सभासद यांनी या बखरीचे लेखन केले आहे. शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्वाच्या घटनांचा उल्लेख या बखरीत आहे. त्यामध्ये अफजल खान वध, शिवाजीचे दिल्लीस प्रयाण, शिवराज्याभिषेक, शिवाजीची भागानगरास भेट आणि शिवाजी व व्यंकोजी भेट हे प्रसंग सविस्तर आले आहेत. नाट्यपूर्ण प्रसंग, चित्रमय वर्णन हे या बखरीचे वैशिष्टे आहे. शिवाजी महाराजांच्याबद्दल अत्यंत आदर आणि उत्कट भावनेचे चित्रण या बखरीत केले आहे. 'शिवदिग्विजय' ही खंडो बल्लाळ चिटणीस यांनी लिहिलेली बखर होय. या बखरीत छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र रेखाटले आहे. आकर्षक शैली, बहुश्रुतता, भाषाप्रभुत्व आणि लेखकाचा प्रामाणिकपणा यामुळे हि बखर वाङ्मय संपन्न आहे.

पेशवेकालीन बखर **:**–

पेशवेकाळात मराठी सत्तेला वैभवाचे दिवस आले होते. समाजजीवनातही चांगली स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे श्रीमंतीचा थाट बखरीमध्येही येऊ लागला. या काळातील भाऊसाहेबांच्या बखरीने वास्तवाचे भान ठेऊन मानवी जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला. मऱ्हाटमोळ्या अभिव्यक्तीचे साधे, सरळ रूपही सौंदर्यशाली असू शकते याचा प्रत्यय पेशवेकालीन बखरी मध्ये येतो.

पानिपतची बखर, भाऊसाहेबांची कैफियत, होळकरांची थैली, काशीराजाची बखर, नाना फडणवीसांचे आत्मचरित्र इ. बखरीतून पानिपतच्या युद्धाची समग्र आणि सविस्तर हकीगत सांगितली आहे. भाऊसाहेबांची बखर ही तर सर्व बखरींचा मुकुटमणी आहे. ल. रा. नसिराबादकर म्हणतात "पानिपतच्या रणसंग्रामाचा सविस्तर वृतांत देणारी महत्वपूर्ण आणि वाङ्मयीन गुणांनी परिपूर्ण अशी समकालीन बखर म्हणजे भाऊसाहेबांची बखर होय". प्रसादिक, जोमदार आणि नाट्यपूर्ण भाषा हे या बखरीचे खास वैशिष्ट्ये आहे. पेशवाईच्या उत्तरकाळात मराठी सत्ता विनाशाच्या वाटेवर उभी असताना मल्हार रामराव चिटणीसांनी सातारच्या दौलतीच्या कारकिर्दीची बखर लिहिली आहे.

'मराठ्यांची बखर' ही ग्रॅट डफने इंग्रजीत लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाचे भाषांतर आहे.सांप्रदायिक स्वरूपाच्या बखरींचे लेखनही या सुमारास झाले. प्रसंगवर्णनपर, सांप्रदायिक, आत्मचरित्रात्मक बखरीप्रमाणे घराण्यांचा ६ ६ इतिहास स्वरूपातही काही बखरी लिहिलेल्या

आढळतात. विविधता व विषयांचे वैचित्र हे पेशवेकालीन बखरीचे वैशिष्ट्य आहे. भाषासौदर्याच्या दृष्टीने या बखरीसमृद्ध आहेत. बखरीबरोबर राज्य प्रशासनपद्धती सारख्या विषयावरही या काळात लेखन होत होते. हे आज्ञापत्र या ग्रंथावरून लक्षात येते. व्यक्तिदर्शन, वर्णनपद्धती, रसपरिपोष आणि भाषाशैली या वाड्मयीन गुणांनी परिपूर्ण असल्यामुळे हे ऐतिहासिक वृत्तकथन आकर्षक आणि मनोरंजक झाले आहे.

बखरींच्या रचनावैशिष्ट्यांचे व भाषाशैलीचे स्वरूप वाड्मय गुणांनी संपन्न आहे. बखरीमध्ये मराठ्यांच्या इतिहासाबद्दल आस्था आणि आतमियता दिसते. त्यांना मराठी दौलतीचा अभिमान आहे. बखरकारांच्या कथानिवेदन शैलीमुळे आणि नवनिर्मितीमुळे 'बखर' ही इतिहासापेक्षा वेगळी निर्मिती ठरते. बखरकरांनी निवेदनात संवादलेखन वापरल्यामुळे नाट्यमयता आणि गतिमानता प्राप्त झाली आहे. व्यक्तीवर्णन, स्थलवर्णन कलात्मकतेने केले आहे. तसेच कथारचनेत आख्यायिकांचा वापर केलेला आहे. प्रवाही निवेदन, गतिमानता आणि रंजकतेमुळे बखरींचे महत्व वाढले आहे.

बखरींची भाषा ही वाड्मयाची भाषा असल्यामुळे तिच्यात नादमाधुर्य, लयबद्धता, सुबोधता, काव्यात्मता आणि अल्पाक्षर रमणीयता, अनुभवसंपन्नता, शब्दसौष्टव, विचारसौंदर्य आणि भावसौंदर्य अशा अनेक वाड्मयगुणाचे दर्शन घडते.

संदर्भ ग्रंथ :-

१) ल. रा. नसीराबादकर – मराठी वाड्मयाचा इतिहास
२) य. च. म. मु. विद्यापीठ – पंडिती, शाहिरी व बखर वाड्मय पृ 48
३) ल. रा. नसीराबादकर – मराठी वाड्मयाचा इतिहास पृ. 257